MP & PPST EMS
Inward No. 8
Dated 1/10/93

जा. क्र. माध्य-३/प्रथम मान्यता/पुणे विभाग/१९९३
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे- ४११ ००१ यांचे कार्यालय.
दिनांक :- 24 SEP 1993

प्रति,
शिक्षणाधिकारी [माध्यमिक]
जिल्हा परिषद
**पुणे**

विषय :- प्रथम मान्यता
**इंग्लिश मिडीयम सेकंडरी स्कूल टिळक रोड**
संदर्भ :- आपले पत्र जा.क्र.शिक्षणा/माध्य/ह-४/९२.९३

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२, ३.३ अन्वये **डेक्कन एज्युकेशन सोसायटी पुणे** संस्थेच्या **इंग्रजी** माध्यमिक शाळेच्या इ. ८वी/९:वी/१०/वी च्या वर्गास सन १९ ९३ १९ ९४या शैक्षणिक वर्षासाठी /सन १९ ९३ पासून प्रथम मान्यता/मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटींच्या पूर्ततेस अधीन राहून देण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी [माध्य] यांनी खालील अटींची पूर्तता शाळा करीत आहे किंवा कसे याची तपासणी करून पुढील मान्यतेच्या वेळी प्रस्ताव पाठविताना खालील अटी पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याचाही अहवाल प्रस्तावासोबत पाठविण्यात यावा.

१] संस्थेने मालकीची शैक्षणिक दृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करून द्यावी.
२] मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३] स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करून द्यावी.
४] स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करून दरवर्षी अधिक ग्रंथाची भर घालावी.
५] विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून द्यावे.
६] पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करून द्यावा.
७] स्वतंत्र स्वच्छतागृहांची सोय उपलब्ध करून द्यावी.
८] वाढीव फीचे दर मा. शिक्षण संचालक, म. रा. पुणे यांचेकडून मंजूर घ्यावेत.
९] शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात
१०] कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणीनुसार वेतन अदा करावे.
११] शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२] विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३] **विज्ञान प्रदर्शन, स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असावा.**

स्थळप्रतीवर शि. उ. सं. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१

प्रत:- मुख्याध्यापक
इंग्लिश मिडियम सेकंडरी स्कूल
टिळकरोड, पुणे-३०

EMSS Record
1/10/93